**ठळक बातम्या**

- २०३० पर्यंत आर्थिक सहकार्य कार्यक्रमावर भारत आणि रशियामध्ये सहमती

- भारतीय रिझर्व्ह बँकेकडून रेपो दरामध्ये पाव टक्का कपात

- कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गावर आंबा घाटात खासगी बस खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातात ३७ जण जखमी, ८ जण गंभीर

**आणि**

- 'मागेल त्याला कृषीपंप' योजनेत राज्याने केलेल्या विश्वविक्रमासाठी गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सकडून प्रमाणपत्र प्रदान

<><><><><>

२०३० पर्यंत आर्थिक सहकार्य कार्यक्रमावर भारत आणि रशियामध्ये आज सहमती झाल्याची माहिती प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दिली. रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांच्यासोबत नवी दिल्लीत द्विपक्षीय चर्चा झाल्यावर संयुक्त निवेदनात ते बोलत होते.

**- - - - होल्ड - बाईट - -**

कृषी आणि खत निर्मिती क्षेत्रात आणखी सहकार्य करण्यावर दोन्ही देश तयार झाले आहेत. संयुक्तरित्या युरिया उत्पादनासाठी दोन्ही देशात प्रयत्न करणार असल्याचं ते म्हणाले. ऊर्जा सुरक्षा हा दोन्ही देशांच्या संबंधातला महत्त्वाचा घटक आहे. याशिवाय नागरी अणूऊर्जेच्या क्षेत्रातही दोन्ही देश सहकार्य करत असल्याचं मोदी म्हणाले.

दहशतवाद हा मानवतेवर हल्ला आहे. त्याच्याविरोधात काम करण्यासाठी दोन्ही देश तयार आहेत. शिवाय युक्रेनचा मुद्दा शांततापूर्ण मार्गाने निकाली निघावा यासाठी होत असलेल्या सर्व प्रयत्नांना भारत पाठिंबा देईल, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

यावेळी आरोग्य, वैद्यकीय शिक्षण, अन्न आणि ग्राहक सुरक्षा, कौशल्य विकास, क्रीडा यासह विविध क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांमध्ये सामंजस्य करार झाले.

त्यापूर्वी पुतीन यांचं आज सकाळी राष्ट्रपतीभवनात औपचारिक स्वागत करण्यात आलं. यावेळी पुतीन यांना गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. त्याआधी पुतीन यांनी नवी

दिल्लीत राजघाटावर महात्मा गांधी यांच्या समाधीस्थळी जाऊन त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं रेपो दरामध्ये पाव टक्का कपात केली आहे. यामुळे आता नवीन रेपो दर सव्वा पाच टक्के झाला आहे. गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज चालू आर्थिक वर्षातला पाचवा पतधोरण आढावा जाहीर केला, त्यावेळी ही घोषणा केली. अधिक माहिती ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

*(महागाईचा कमी झालेला दर आणि वाढलेली मागणी यांच्या आधारावर आज व्याजदर कपात केल्याचं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. यामुळे गृहनिर्माण, वाहन आणि व्यावसायिक कर्जांसह विविध कर्ज स्वस्त होण्याची अपेक्षा आहे. इतरही दर कायम ठेवण्याचा निर्णय पतधोरण आढावा समितीच्या बैठकीत आज झाला.*

*गेल्या तिमाहीत आर्थिक वृद्धीदरात झालेली वाढ, जीएसटीतली कपात, सणासुदीच्या काळात नागरिकांनी केलेली खरेदी या जोरावर देशाचा आर्थिक वृद्धी दर आणखी वाढेल, अशी आशा रिझर्व्ह बँकेनं व्यक्त केली. त्यामुळं चालू ७ पूर्णांक ३ दशांश टक्के राहील असा अंदाज बँकेनं व्यक्त केला. दोन महिन्यापूर्वी हा दर ६ पूर्णांक ८ दशांश टक्के राहिल असं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं होतं. सलग दुसऱ्यांदा रिझर्व्ह बँकेनं जीडीपीच्या अंदाजात सुधारणा केली आहे. त्याचवेळी सलग दुसऱ्यांदा रिझर्व्ह बँकेनं किरकोळ चलनवाढीच्या दराचा अंदाज कमी केला आहे. आता हा दर चालू आर्थिक वर्षात २ टक्के राहील, असं बँकेचं म्हणणं आहे. बाजारातली भांडवली उपलब्धता पाहता रिझर्व्ह बँकेनं १ लाख कोटींचे सरकारी रोखे खुल्या बाजारपेठेतून खरेदी करण्याचाही निर्णय घेतला आहे. रिझर्व्ह बँकेच्या लोकपालाकडे प्रलंबित असलेल्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी १ जानेवारीपासून २ महिन्यांची विशेष मोहिम राबवणार असल्याची घोषणाही गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज केली. त्याचवेळी ग्राहकांच्या सुविधेकडे विशेष लक्ष द्यावं आणि त्यांच्या तक्रारी कमी होतील, याची काळजी घेण्याची सूचना त्यांनी बँका आणि वित्तीय संस्थांना केली. )*

**<><><><><>**

देशात रेल्वे अपघातांच्या संख्येत ९० टक्के घट झाल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. २००४ ते २०१४ यादरम्यान देशात १७१ रेल्वे अपघात झाले होते, मात्र सरकारच्या विविध उपाययोजनांमुळे त्यांचं प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. अपघातांमागच्या मूळ कारणांचा अभ्यास करून त्यावर तोडगा काढण्याचं काम सरकार करत आहे, स्वदेशी बनावटीचं कवच हे तंत्रज्ञान यासाठीच विकसित केलं आहे, असंही ते म्हणाले. देशात धावणाऱ्या जवळपास २५ हजार रेल्वेगाड्यांपैकी ८० टक्के गाड्या वेळेवर धावतात, याकडेही त्यांनी लक्ष वेधलं.

<><><><><>

वक्फ मालमत्तांची नोंदणी करण्यासाठी सुरू झालेल्या उमीद या पोर्टलवर एक लाख ५१ हजारांपेक्षा जास्त मालमत्तांची नोंदणी करण्यात आली आहे, अशी माहिती केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली आहे. ते आज नवी दिल्लीत पत्रकारांशी बोलत होते. वक्फ कायदा केल्यानंतर हे पोर्टल सुरू करण्यात आलं होतं आणि संबंधितांना वक्फ मालमत्तांची नोंदणी करण्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी देण्यात आला होता. आज नोंदणी करण्याचा शेवटचा दिवस असून अद्यापही लाखो मालमत्तांची नोंदणी झालेली नाही. पुढच्या तीन महिन्यांपर्यंत नोंदणी करणाऱ्यांवर मंत्रालयाकडून कोणताही दंड आकारला जाणार नाही किंवा कठोर कारवाई केली जाणार नसल्याचं आश्वासन रिजिजू यांनी यावेळी दिलं.

<><><><><>

देशात मोबाईल फोन आणि संगणकाच्या सहाय्यानं सायबर गुन्हे करण्याच्या प्रमाणात वाढ झाल्याचं राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या आकडेवारीत आढळून आलं आहे. २०२१ च्या तुलनेत २०२३ मध्ये या प्रकरणांमध्ये ३३ हजारांनी वाढ झाली आहे. देशात विशेषतः हरयाणा, पंजाब आणि हिमाचल प्रदेशमध्ये या गुन्ह्यांचं प्रमाण अधिक आहे.

<><><><><>

दिल्लीत लाल किल्ल्याच्या जवळ झालेल्या बॉम्ब स्फोट प्रकरणातला आरोपी सोयबच्या NIA कोठडीत कोर्टानं १० दिवसांची वाढ केली आहे. या बॉम्ब स्फोटासाठी त्यानं वाहन आणि इतर मदत पुरवल्याचा आरोप आहे.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
५ डिसेंबर २०२५ - शुक्रवार

<><><><><>

कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गावरच्या आंबा घाटात आज पहाटे खासगी बस  खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातात ३७ जण जखमी झाले आहेत. त्यातल्या ८ जणांची प्रकृती गंभीर आहे. जखमींना साखरपा प्राथमिक आरोग्य केंद्रात तर गंभीर जखमींना रत्नागिरीच्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. मध्य प्रदेशातून येणाऱ्या या बसमध्ये आंबा बागेत काम करणारे नेपाळमधले कामगार होते. बसमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी प्रवास करत असल्याची प्राथमिक माहिती आहे. स्थानिकांनी तातडीनं घटनास्थळी धाव घेऊन मदत कार्य सुरु केलं आहे.

<><><><><>

‘मागेल त्याला सौर कृषीपंप’ या योजनेत राज्यानं केलेल्या विश्वविक्रमाचं प्रमाणपत्र देण्याचा कार्यक्रम आज छत्रपती संभाजीनगर इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झाला. गिनीज बुकच्या प्रतिनिधींनी हे प्रमाणपत्र देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केलं. महावितरणने एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौरकृषीपंप स्थापन करण्याचा उच्चांक केला आहे. या विश्वविक्रमाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे.

<><><><><>

अनाथांसाठी शासकीय सेवेत १ टक्के आरक्षण ठेवल्यानं ८०० हून अधिक युवक-युवती आजपर्यंत राज्य सरकारच्या सेवेत दाखल झाले आहेत. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी समाधान व्यक्त केले. विद्यमान सरकारच्या वर्षपूर्तीनिमित्त त्यांनी मुंबईत अनाथ मुलांशी संवाद साधला. देशाच्या, राज्याच्या विकासासाठी सदैव कार्यरत राहण्याचं आवाहन त्यांनी या मुलांना केलं.

<><><><><>

राज्यातल्या महायुती सरकारची वर्षपूर्ती झाली तरी जनतेच्या पदरी मात्र निराशाच पडली आहे, अशी टीका काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. ते आज नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. सरकारनं येत्या हिवाळी अधिवेशनात आपल्या एक वर्षाच्या कामाची श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

<><><><><>

मुंबई विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र २०२६ मध्ये विविध पदवी अभ्यास क्रमाअंतर्गत होणाऱ्या परीक्षांच्या तारखा विद्यापीठाने जाहीर केल्या आहेत. यामध्ये पदवी स्तरावरील तृतीय वर्षाच्या विविध क्षेत्रांतल्या विविध विषयांच्या ६व्या सत्राच्या परीक्षा १ एप्रिल आणि ८ एप्रिल २०२६ पासून सुरू होणार आहेत.

<><><><><>

नाशिकच्या गोदावरी नदीच्या प्रदूषण रोखण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने २०१८ साली दिलेल्या आदेशांचं पालन न केल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयात अवमानना याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेच्या सुनावणी दरम्यान उच्च न्यायालयाने यासंबंधी सर्व शासकीय यंत्रणांना आपले उत्तर देण्याची नोटीस बजावली आहे.

//<><><><><>//